# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

**सन २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १९**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ६८, रूपये:- २३,२३,००,००,०००/-**<br>**श्री. सुभाष धोटे** |
| (१) | ६५३० | १० | अमृतनगर जोगेश्वर (पश्चिम) मुंबई येथील सी.टी.एस.क्र. ५०६ ओशिवरा हा भूखंड गार्डन व खेळासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व म.न.पा.ने आरक्षित केला असणे, तथापि सदरच्या गार्डन व खेळाच्या मैदानाच्या जागेवर अनाधिकृतपणे सुमारे ८ ते १० गाळे बांधले असणे, या संदर्भात स्थानिक नागरीकांन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे व म.न.पा.कडे तक्रारी केल्या असणे, मात्र सदरचे बांधकाम पाडण्यात आले नसणे, यासंदर्भातील अनाधिकृत बांधकामधारक व ओशिवरे जिल्हा केंद्र (ओ.डी.सी.) च्या संबंधित अधिकाऱ्यांचे संगनमत असणे, त्यामुळे अनाधिकृत बांधकाम तोडले जात नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (२) | ६५१७ | १० | पावसाळयात मुंबई धोकादायक इतारतींचे सर्वेक्षण करण्यात येते, या वर्षी सर्वेक्षणातून १८८ अतिधोकादायक इमारती असल्याचे निदर्शनास येणे, सर्वाधिक ११४ अतिधोकादायक इमारती मालाड, बोरिवली, मुंलूड, अंधेरी पश्चिम येथे असणे, शहर भागातील २७ आणि पूर्व उपनगरातील ४७ इमारती असणे, जोरदार पावसात अशा अतिधोकादायक इमारती कोसळून दुर्घटना घडून जिवित हानी होणे, अनेक रहिवासी इमारती रिकाम्या करण्यास टाळाटाळ करित असणे, या इमारती पावसाळयापुर्वी रिकाम्या करुन संभाव्य दुर्घटनेत प्राणहानी होणार नाही याची खबरदारी घेण्याचे आव्हान महापालिकेवर असणे, मुंबईतच नव्हे तर ठाणे, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार, मीरा-भाईंदर, नवी मुंबई महापालिका हद्दीतही हा प्रश्न ऐरणीवर असणे, अतिधोकादायक इमारती बाबत सुनिश्चित कार्यपध्दती वापरण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायायोजना. |
| (३) | ६५१८ | १० | पावसाळयात मुंबई सह अनेक ठिकाणी दरड कोसळून होणाऱ्या दुर्घटने जीवित हानी झाल्याचे प्रकार घडणे, वर्षानुवर्षे पावसाळयात दरड कोसळण्याच्या घटना घडूनही स्थानिक प्रशासनाकडून अशा दुर्घटना रोखण्यास येत असलेले अपयश, मुंबईत 22 हजार कुटूंब डोंगराळ भागातील दरडींच्या छायेत जीव मुठीत घेऊन राहत असणे, मुंबईत मागील काही वर्षामध्ये दरडी कोसळून झालेल्या दुर्घटांमध्ये 310 लोकांना |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्राण गमवावे लागणे, तर ३०० हून अधिक लोक गंभीर जखमी होणे, मुंबईत भांडुप,विक्रोळी, कांजूरमार्ग या ठिकाणी डोंगराळ भाग मोठया प्रमाणात असून भांडूपमध्ये ४२ ठिकाणी दरड कोसळण्याचा धोका अधिक असणे, या घटना नैसर्गिक नसून मानवनिर्मित आपत्ती असल्याचे भूगर्भ अभ्यासकांनी स्पष्ट केले असणे, डोंगराळ भागातील दरड कोसळून जिवीत व वित्त हानी टाळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपयायोजना. |
| (४) | ६५१९ | १० | दक्षिण मुंबईमध्ये पायधुनी, भुलेश्वर, उमरखाडी, कामाठीपुरा, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, येथील परिसरात इमारती कोसळण्याचे प्रकार घडत असणे, विशेषतः पावसाळयामध्ये येथील इमारतींमधील रहिवाशी जीव मुठीत घेऊन रहाणे, या परिसरातील अनेक इमारती या अतिशय जुन्या झाल्या असल्याने या भागात दरवर्षी दुर्घटना घडून अनेक लोकांचे मृत्यू होत असणे, प्रशासनाच्या दुर्लक्षितपणामुळे येथील अनेक जुन्या इमारतीत बेकायदा बांधकामे आढळून येणे, यामुळे शासनाने येथील इमारतींचे सर्वेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज निर्माण झालेली असणे, परंतु या सर्वेक्षणासाठी म्हाडाकडे कर्मचारी वर्गाचा तुटवडा असणे, याप्रकरणी संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी शासनाकडून मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यास विलंब होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ६५२० | १० | मुंबईमध्ये अनेक विभागात सतत वाहतूक कोंडी होत असणे, वाहनांची संख्या वाढत असल्याने वाहनतळ अपुरी पडत असणे, खास करून मुंबादेवी विधानसभ क्षेत्रात सतत गजबज असणे, वाहनकोंडीमुळे वाहनचालक तसेच नागरिक त्रस्त असणे, अशा वाहनकोंडीमध्ये रुग्णवाहिका अडकल्याने रुग्णांना देखील वेळेत उपचार मिळण्यासाठी विलंब होत असणे, वाहतूक कोंडीमुळे अनेकदा अपघात होंत असणे, वर्दळ आणि वाहनकोंडीमुळे ध्वनी प्रदूषण देखील मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ६५२२ | १० | मुंबईमध्ये अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, सदर इमारतींना दुरुस्तीची किंवा पुनर्विकासाची गरज असणे, यामध्ये सर्वात जास्त इमारती दक्षिण मुंबईत असणे, अश्या धोकादायक इमारतीमध्ये रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन रहात असणे, मुंबईत यावर्षी उशिरा पावसाळा सुरु होणे, पावसामुळे मुंबईमध्ये घडणाऱ्या दुर्घटनांना सुरुवात होणे, मुंबईमध्ये विविध ठिकाणी इमारतीचा भाग किंवा इमारतीची बाल्कनी कोसळण्याच्या दुर्घटना घडणे, या दुर्घटनांमध्ये झालेले मृत्यू अतिशय गंभीर बाब असणे, पहिल्याच पावसात सलग झालेल्या दुर्घटनांमुळे नागरीकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | ६५२३ | १० | मुंबईमध्ये आजमितीस हिंदू व इतर धर्मियांच्या खासगी व महापालिका मिळून २०१ स्मशानभूमी व दफनभूमी असणे, अंत्यसंस्काराच्या ठिकाणी प्राथमिक स्वरूपाच्या आवश्यक सुविधा पुरविणे गरजेचे असणे, अनेक ठिकाणी अत्याधुनिक सोयीसुविधांनी पूर्ण अश्या स्मशानभूमी असणे, काही ठिकाणी विद्युत दहन वाहिनीची व्यवस्था असणे, परंतू तेथे स्थानिकांची गैरसोय होण्याच्या घटना वारंवार घडत असणे, स्मशानभूमी त्याचप्रमाणे दफनभूमी येथे स्वच्छता, बसण्याच्या जागा, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी यांची नीट देखभाल घेतली न जाणे, काही ठिकाणी दफनविधीसाठी जागा अपुरी पडणे, अनेक ठिकाणी तर स्मशानभूमी अथवा दफनभूमीकडे जाताना अनेक समस्यांचा सामना नागरीकांना करावा लागणे, स्मशानभूमी अथवा दफनभूमी परिसराची योग्य ती देखभाल करण्याबाबत आरोग्य विभाग उदासीन असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ६५२४ | १० | मुंबईमध्ये शेकडो किमीच्या भूमिगत मलवाहिन्या असणे, त्यांच्या सफाईसाठी मॅनहोलमध्ये माणसे उतरवली जाणे, मॅनहोलमधील विषारी वायुमुळे अनेक कंत्राटी कर्मचारी मृत्युमुखी पडणे, काही कर्मचाऱ्यांना श्वसनाचे जीवघेणे विकार जडणे, भूमिगत गटारात उतरून हाताने मैला साफ करण्यास बंदी असणे, मुंबई महापालिकेकडे आधुनिक व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामग्री उपलब्ध असताना देखील आजही सफाई कामगारांना मॅनहोलच्या घाणीत माणूस उतरवून भूमिगत गटारांची सफाई करण्यात येणे, भूमिगत गटारांमध्ये सफाई करताना गोवंडीमध्ये दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू होणे, कांदिवली येथे भूमिगत गटारातून सफाई करून बाहेर येताना कामगाराच्या अंगावरून गाडी जाणे, आतापर्यंत ४१ जणांचा भूमिगत गटारात पडून मृत्यू होणे, सफाई कामगाराच्या सुरक्षेसाठी कोणतीही प्रणाली किंवा साहित्य देण्यात न येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ६९, रूपये:- १०,००,००,००,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (९) | ६५३३ | १० | चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील ब्रम्हपुरी या नगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी आणि वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने निधीची तरतूद करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली असणे, या नगरपालिका क्षेत्रातील रस्ते, पाणी, शौचालय, गटारे, घरकुल योजना या कामांसाठी निधीची आवश्यकता असलयाने तातडीने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६५३४ | १० | चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील सिंदेवाही या नगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी आणि वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने निधीची तरतूद करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
| --- | --- | --- | --- |
| | | | केलेली असणे, या नगरपालिका क्षेत्रातील रस्ते, पाणी, शौचालय, गटारे, घरकुल योजना या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने तातडीने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ६५३५ | १० | चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील सावली या नगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी आणि वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने निधीची तरतूद करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली असणे, या नगरपालिका क्षेत्रातील रस्ते, पाणी, शौचालय, गटारे, घरकुल योजना या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने तातडीने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७१, रूपये:- २,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१२) | ६५६० | १० | मलकापूर विधानसभा मतदारसंघातील मलकापुर व नांदुरा हया दोन्ही "ब" वर्ग नगर पालिका असणे, या दोन्ही शहराचे शहरीकरण दिवसेंदिवस वाढत असणे, लोकसंख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झालेली असणे, शहरात वारंवार पाणी पुरवठा वितरणाच्या जलवाहिन्याबाबत तक्रारी येत असणे, जलवाहिन्याची वांरवार गळती होत असणे, त्यामुळे वितरण वाहिका अद्यावत करून लोकांना मुबलक पाणी पुरवठा करणे आवश्यक असणे, त्याकरिता मलकापुर व नांदुरा नगर परिषदेने प्रस्ताव तयार केले असुन सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यता मिळणेसाठी मुख्य अभियंता, म.जी.प्रा. अमरावती यांच्याकडे सादर केलेला असणे, सदर योजनेसाठी मलकापुर नगररिषदेकरीता ७९.३२ कोटी रुपयाची निधीची व नांदुरा नगररिषदेकरीता अंदाजे ९३.९१ कोटी रुपयाची निधीची आवश्यकता असून हा निधी उपलब्ध करुन देण्याबाबात शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१३) | ६५५८ | १० | तिवसा नगर पंचायत हे तालुक्याचे ठिकाण असून अमरावती जिल्ह्यातील नवनिर्मित नगर पंचायत आहे. शहराचा पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान अंतर्गत रु २८.९९ कोटी रुपयांचा प्रस्ताव तांत्रिक मंजुरी घेऊन पुढील कारवाई व प्रशासकीय मान्यता मिळावी याबाबत मुख्यमंत्री कार्यालय मुंबई येथे प्रलंबित असणे, तिवसा शहरांतील नागरिकांना दरवर्षी पाणी टंचाई ला सामोरे जावे लागत असणे, नदीला व डोह जो स्त्रोत आहे त्यात योजनेसाठी पाणी मुबलक आहे पण एकच टाकी असणे, त्यामुळे (स्टोरेज) तरी नाही महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान अंतर्गत रु २८.९९ कोटी रुपयांचा प्रस्ताव तांत्रिक मंजुरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७३, रूपये:- ३५,२६,००,००,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (१४) | ६५३६ | १० | चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील ब्रम्हपुरी या नगरपालिका क्षेत्रात अमृत २.० अभियानाच्या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने निधीची तरतूद करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली असणे, या नगरपालिका क्षेत्रातील अमृत २.० अभियांनाच्या कामांसाठी रस्ते, पाणी, शौचालय, गटारे, घरकुल योजना या कामांसाठी निधीची आवश्यकता असलयाने तातडीने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ६५३७ | १० | चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील सिंदेवाही या नगरपालिका क्षेत्रात अमृत २.० अभियानाच्या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने निधीची तरतूद करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली असणे, या नगरपालिका क्षेत्रातील अमृत २.० अभियांनाच्या कामांसाठी रस्ते, पाणी, शौचालय, गटारे, घरकुल योजना या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने तातडीने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१६) | ६५३९ | १० | चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील सावली या नगरपालिका क्षेत्रात अमृत २.० अभियानाच्या कामांसाठी निधीची आवश्यकता असल्याने निधीची तरतूद करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली असणे, या नगरपालिका क्षेत्रातील अमृत २.० अभियांनाच्या कामांसाठी रस्ते, पाणी, शौचालय, गटारे, घरकुल योजना या कामांसाठी निधीची आवश्यकता असलयाने तातडीने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**बाब क्रमांक: ७९, रूपये:- ५०,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१७) | ६५५९ | १० | नगरपरिषद नांदुरा जिल्हा बुलढाणा ची हद्दवाढ सन 2016 मध्ये झालेली आहे, नगरपरिषदेच्या हद्दवाढ झालेल्या भागात अद्यापही पाणी, रस्ते, नाली बांधकाम ,आरोग्य सुविधा व अनुषंगीक विकास कामे झालेली नाहीत.सन 2016 पासुन नगरपरिषद नांदुरा यांनी हद्दवाढ झालेल्या भागाचा विकास करण्यासाठी नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु अद्याप देखील सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निधी प्राप्त झालेला नाही.करिता नगरपरिषद नांदुरा जिल्हा बुलढाणाच्या हद्दवाढ झालेल्या या भागाचा विकास करण्यासाठी विशेषबाब म्हणून 25 कोटी रुपये निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (१८) | ६५३१ | १० | जळगाव जिल्ह्यातील फैजपूर नगरपालिका ही ‘क’ दर्जा ची असून नुकतीच नगरपालिका हद्द वाढ झालेली असणे, त्यामुळे ग्रामीण क्षेत्राचा काही भाग हद्दवाढीत आलेला असल्याने त्यांचा विकास होण्यासाठी व नागरिकांना मूलभुत सुविधा पुरविणे आवश्यक असणे, परंतु गेल्या पंधरा महिन्यापासून पाच मुख्याधिकारी यांनी प्रभारी पदभार सांभळला आहे.परंतु पूर्णवेळ मुख्याधिकारी नसल्याने पाणी पुरवठा, वीज पुरवठा, स्वच्छता इ. साठी शहरातील नागरिकांनी मोठा प्रमाणात संताप व्यक्त करून ठिय्या आंदोलन करणे, अशीच परिस्थिती सुध्दा यावल नगरपरिषदेची असणे, फैजपूर व यावल येथील नगररिषदांना तत्काळ मुख्याधिकारी यांची नेमणूक करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | ६५३२ | १० | जळगाव जिल्ह्यातील फैजपूर नगरपरिषद हद्दीतील सर्व घरांची फेर मालमत्ता कर आकारणी सन २०२४- २५ ते २०२७-२८ या वर्षांकरिता नवीन टेंडर मागविण्यात आले होते. सदर निविदेसाठी मा. जिल्हाधिकारी यांची प्रशासकीय मान्यता न घेता टेंडर काढण्यात येणे, टेंडर प्रक्रीयेसंदर्भात नगरपरिषदेच्या वार्षिक अंदाज पत्रकात त्याची तरतूद केल्याचे दिसत नसणे, तसेच कार्यालयीन कर निरिक्षक यांची टिप्पणी व पावती सुध्दा नसणे, सदर टेंडर ऑर्डर आचारसंहितेपूर्वी दिलेली असून प्रत्यक्ष कामाला सुरूवात झालेली नसणे, फैजपूर शहरातील नागरिकांना अतिरिक्त वाढीव आकारणीच्या रक्कमेतून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १० जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.